ठाण्यात महायुतीमध्ये नाराजीनाट्य

(पान १ वरून) मतदारसंघावरून महायुतीत तिढा निर्माण झाला होता. भाजपने त्यावर हक्क सांगितल्याने शिवसेना आणि भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. भाजपच्या वतीने येथून माजी खासदार संजीव नाईक हे इच्छुक होते. गेल्या सुमारे वर्षभरापासून त्यांनी त्यादृष्टीने बांधणी सुरू केली होती. मात्र हा मतदारसंघ अखेरच्या क्षणी शिवसेनेकडे गेला. त्यामुळे नवी मुंबई भाजपमधील गणेश नाईक समर्थकांमध्ये नाराजी पसरल्याचे दिसत आहे. समाजमाध्यमांतूनही 'आम्ही नाईक समर्थक', 'आमचा उमेदवार संजीव नाईक' अशा आशयाचे संदेश झळकले होते.

आमदार गणेश नाईक यांच्या 'क्रिस्टल हाऊस'मध्ये गुरुवारी सकाळपासूनच बैठकांचा सपाटा सुरू झाला. संजीव नाईक यांना उमेदवारी देण्यात न आल्याने भाजपच्या माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, मंडल, बूथ संघटक आणि वॉरियर्सनी पदाचे राजीनामे दिले. गुरुवारी स्वतः नरेश म्हस्के व आमदार प्रताप सरनाईक हे गणेश नाईक यांची भेट घेण्यासाठी कोपरखैरणे येथील 'क्रिस्टल हाऊस'मध्ये आले असता नाईक समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे म्हस्के यांना तेथून काढता पाय घ्यावा लागला, असे सांगण्यात येते. मीरा-भाईंदरमध्येही भाजपच्या काही नाराज पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. यामुळे शिवसेना शिंदे गट व भाजपमधील गणेश नाईक समर्थक यांच्यात दुफळी असल्याची चर्चा सुरू झाली आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघातील सहापैकी चार विधानसभांवर भाजपचे वर्चस्व आहे. नवी मुंबई महापालिका ही भाजपचे आमदार व माजी मंत्री गणेश नाईक यांच्या हातात आहे.

कार्यकर्त्यांची भावना असते, मात्र नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करायचे असल्याने सर्वांना एक दिलाने काम करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यांची नाराजी दूर करून त्यांनी आपले राजीनामे देखील मागे घेतले आहेत.

▮ संजय केळकर, आमदार, भाजप

महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के हे शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्याची तयारी करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कोणत्याही प्रकारची नाराजी किंवा राजीनामे कोणीही दिलेले नाहीत.

▮ संजय वाघुले, शहर अध्यक्ष, भाजप, ठाणे

मतदानाच्या टक्केवारीवरून नवा वाद

(पान १ वरून) देशाचा निवडणूक आयोग हा मोदी-शाहांच्या पकडीत गुदमरलेला आहे. ईव्हीएम, आचारसंहितेची प्रकरणे असो किंवा कारवाई असो किंवा शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर आयोगाने दिलेल्या निर्णयात आता वाढवलेल्या आकडेवारीची भर पडली आहे. साधारणतः ६ ते ७ टक्के मते अचानक वाढल्याचे दाखवल्याने आयोगाची कार्यपद्धती संशयास्पद वाटते, असा आरोप संजय राऊत यांनी केला. नांदेडमध्ये मतदानानंतर ५२ टक्के मतदान झाले होते. आता हीच आकडेवारी ६२ टक्क्यांवर गेली आहे. वाढलेल्या आकडेवारीत मतदान कोणी केले. मतदानाची टक्केवारी जाहीर करायला ११ दिवस का लागले? असा प्रश्न उपस्थित केला. सध्या डिजिटल इंडिया असल्याने सर्व काही खूपच धक्कादायक आहे, असा घणाघात राऊत यांनी चढवला.

त्यांना ते मुख्यमंत्री पदासाठी लायक समजत नाहीत – राऊत

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच घोटाळे बाहेर काढणार असा दावा केला. मात्र फडणवीस काहीही गौप्यस्फोट करत नाहीत. त्यांच्याकडे स्फोट करण्याइतके काहीही गोपनीय नसते. ते आता स्फोटक राहिलेले नसून लवंगी फटाका इतकाही स्फोट करू शकत नाहीत, असा खोचक टोला राऊत यांना लगावला. तसेच उद्धव ठाकरे आणि शिवसेनेवर खोटे आरोप करण्यापलीकडे फडणवीस काहीही करत नाहीत. ठाकरेंनी मुख्यमंत्री व्हा, असे विधान केले असेल तर हा गौप्यस्फोट आहे का, असा सवाल केला. मोदी-शाहा यांनी फडणवीसांना मुख्यमंत्री पद दिले नाही. पक्षाचे वरिष्ठ नेते तुम्हाला मुख्यमंत्री पदासाठी लायक समजत नाहीत. तिथे आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री पद देणारे कोण, असा राऊत यांनी फडणवीसांना चिमटा काढला.

भाजपने बृजभूषण सिंह यांचे तिकीट कापले

(पान १ वरून) मतदारसंघातील आपला उमेदवार जाहीर केला. बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप करीत महिला कुस्तीपटूंनी गेल्या वर्षभरात दिल्लीत आंदोलन केले. त्यामुळे भाजपने त्यांना उमेदवारी देणे टाळले आहे. त्यांच्याऐवजी त्यांचा ३४ वर्षीय धाकटा मुलगा करण सिंह यांना भाजपने कैसरगंजमधून रिंगणात उतरवले आहे. करण सिंह राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज आहे. दुसरीकडे काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या रायबरेली मतदारसंघात भाजपने दिनेश प्रताप सिंह यांना उमेदवारी दिली आहे. या जागेवर काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी सलग ५ वेळा निवडून आल्या होत्या. परंतु यंदा त्या राजस्थानमधून राज्यसभेवर निर्वाचित झाल्या आहेत. त्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक त्या लढणार नाहीत. तरीही काँग्रेस पक्षाने रायबरेलीतील उमेदवाराची घोषणा अद्यापही केलेली नाही.

पंतप्रधानपदाची अप्रतिष्ठा झाली

(पान १ वरून) नंतर करण्यात आली होती. आताही निवडणुकीनंतर आम्ही स्थिर सरकार देशाला देऊ. कांदा निर्यात विषयावर पवार म्हणाले, कांदा उत्पादकांसाठी शासनाने सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे. मी कृषिमंत्री असताना कांदा निर्यात धोरणाच्या बाजूने होतो. त्यामुळे उत्पादकांना २ पैसे मिळतील, अशी भूमिका होती. साताऱ्यातील शशिकांत शिंदे यांच्यावर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा एकप्रकारे सत्तेचा गैरवापर होत असल्याचा आरोप पवार यांनी केला. देशभरात असा वापर होत आहे. झारखंड, दिल्लीचे मुख्यमंत्री, पश्चिम बंगालमधील काही मंत्री अशी उदाहरणेही त्यांनी दिली.

▮ मोदींचा जावईशोध

नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांबाबत शरद पवार म्हणाले, इंडिया आघाडी सत्तेत आल्यावर ते धर्मावर आधारित आरक्षण देतील, असा जावईशोध पंतप्रधान मोदींनी प्रचारसभांमध्ये लावला आहे. सत्ताधारी असे विधान करून समाजामध्ये तेढ पसरवत आहेत. आम्ही कधीच धर्मावर आधारित आरक्षणावर बोललो नाही. तसेच वारसा कर, संपत्तीचे पुनर्वाटप इंडिया आघाडीवाले करतील, असे खोटे आरोपही ते करत असल्याचे मत पवार यांनी व्यक्त केले.

उन्हेरे धरणात तरुण बुडाला

(पान १ वरून) सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास तो धरणामध्ये बुडाला. गुरुनाथ साठीलकर यांच्या अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे विजय भोसले, दर्श अभानी, राजेश पारठे, महेश भोसले, विशाल चव्हाण, सौरभ घरत, ओम ठकेकर, जय भोसले, निलेश यादव व प्रदीप गोळे यांनी अद्ययावत उपकरणांच्या साहाय्याने या तरुणाचा मृतदेह बाहेर काढला. या वेळी पाली पोलीसदेखील त्या ठिकाणी उपस्थित होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांनी या ठिकाणी पंचनामा केला.

बारवी नदीत तिघांचा मृत्यू

(पान १ वरून) खदानींमध्ये पोहण्यासाठी तरुण जात असतात. अशाच प्रकारे बुधवारी दुपारी अंबरनाथ पश्चिमेतील घाडगे नगर परिसरात राहणारे तिकेश मुरगु (२३), सुहास कांबळे आणि युवराज हुली (१८) हे तिघे मित्र बदलापूरजवळील बारवी धरणाच्या प्रवाहातील बारवी नदीत पोहण्यासाठी गेले होते. मात्र यावेळी पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने युवराज पाण्यात बुडू लागल्याने त्याला वाचवण्यासाठी सुहासने धाव घेतली. मात्र युवराज आणि सुहास दोघेही बुडत असल्याने त्यांना वाचवण्यासाठी गेलेला तिकेशही पाण्यात बुडाला. त्यामुळे एकमेकांना वाचवण्यासाठी गेलेल्या या तिन्ही मित्रांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

...तर चर्चगेट स्थानक जप्त करू!

(पान १ वरून) वाद लवादाकडे गेला. लवादाने २०१५ साली कंपनीला ३ कोटी ९५ लाख ९४ हजार ७२० रुपये देण्याचे आदेश रेल्वे प्रशासनाला दिले. मात्र रेल्वे प्रशासनाने पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर कंत्राटदार कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेत रेल्वे प्रशासनाच्या विरोधात याचिका दाखल केली. या याचिकेवर अभय आहुजा यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी रल्वे प्रशासनाने न्यायालयाकडे मुदत देण्याची विनंती केली. मात्र न्यायालयाने ही विनंती फेटाळून लावत चार आठवड्यांत थकीत रक्कम देण्याचे निर्देश द्या; अन्यथा चर्चगेट रेल्वे स्थानकाची इमारत जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी तंबीच रल्वे प्रशासनाला दिली.

त्यांनी केले की स्ट्रॅटेजी, मी केले की गद्दारी?

(पान १ वरून) तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी माझी भेट घेऊन कोणाला मुख्यमंत्री करणार, अशी विचारणा केली होती. मात्र, आमच्या वरिष्ठांनी तीन-चार मंत्रीपदांसाठी मुख्यमंत्रीपद नाकारले. देवेंद्र फडणवीस २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाले. त्या वेळी मी मुंबईला पोहोचेपर्यंत प्रफुल्ल पटेल यांनी भाजपला राष्ट्रवादी काँग्रेसचा बाहेरून पाठिंबा आहे, असे जाहीर केले. मी म्हटले हे कसे काय झाले, तर मला म्हणाले, ही आपली स्ट्रॅटेजी आहे. २०१९ लाही असेच घडले. सुरुवातीपासून भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसमवेत एका उद्योगपतीच्या मध्यस्थीने सरकार स्थापनेची चर्चा करण्यात आली. त्यानुसार आम्ही शपथविधीचीही चर्चा केली. त्यानंतर मुंबईत आल्यावर शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार स्थापन करण्यात येणार असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. याचदरम्यान शरद पवार आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यात वाद झाला. त्यामुळे आम्ही वैतागून पहाटेचा शपथविधी आणि पुढील राजकीय घडामोडी घडल्या.

NOTICE is hereby given that the two Share Certificates for shares held by Late **Mr. Shirish Vitthal Marathe** in the capital of Larsen & Toubro Limited has been lost or misplaced. Share Cert. Nos. 20624 and 1358662 and therefore I, Arati Shirish Marathe applied for issue of duplicate share certificates in lieu of the lost certificates. Anyone who finds the same, is requested to contact at Mob. No. 8459313993

वडगाव मावळ, जि. पुणे येथील दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हीजन सो. यांचे मे. रा. अ. शिंदे यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. : ३०/२०२४

निशाणी क्र. : ९

जाहीर नोटीस

सुधीर भालचंद्र देशपांडे ... अर्जदार

विरुद्ध

कोणी नाही ... जाब देणार

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी भारतीय कायदा कलम २७६ अन्वये सक्सेशन सर्टिफिकेट अन्वये या कोर्टाकडे **मयत नारायण दिवाकर देशपांडे यांचे** भारतीय वारसा कायदा १९२५, कलम २७६ प्रमाणे **सक्सेशन सर्टिफिकेट** मिळविण्यासंबंधी हरकत घ्यावयाची असेल, त्याने नेमलेली **तारीख २८/०६/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता** स्वतः किंवा वकीलांमार्फत या कोर्टात हजर राहावे.

आज दिनांक २६/०४/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

सही/- (शिक्का) हुकूमान्वये, सही/-

क. लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, वडगाव मावळ, पुणे

MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

E-TENDER NOTICE

Tender Specification No.-CE(C)-III/HO/RFX No. 3000046890/2023-24

NAME OF WORK: Work of providing services of persons through outsourcing for various office works in MAHAGENCO for one year at Mumbai.

Estimated Value: Rs. 5,27,70,537/- (Without GST)	**Tender Fee:** 3,540/-
Sale Date: 03/05/2024 to 23/05/2024 up to 17:00 Hrs.	**E.M.D.:** 5,28,000/-
Date of Submission : 24/05/2024 up to 15:00 Hrs.	

Contact Person- Supdt. Engineer(C), O/o Chief Engineer (Civil)-III M.S.P.G. Co. Ltd. Mumbai Fax: (022) 26581469 Tel. No.: 022-26474211 extn. 2590, 26472131

For further details visit our Website: **https://eprocurement.mahagenco.in**

Agencies are requested to register themselves for this and future E – Tenders.

Chief Engineer (C)-III, MGPGCL, Mumbai

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : U67100TZ2014PTC020363, कॉर्पोरेट कार्यालय : कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८

ई-मेल : zuber.khan@omkaraarc.com/rajesh.jumani@omkaraarc.com

प्राधिकृत अधिकाऱ्यांचा मोबा. नं. : + ९१८६५७९६९२३१

(परिशिष्ट-४-ए) (नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) च्या तरतुदी पाहा)

स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीची जाहीर सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''सरफेसी कायदा'') सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन ९ (१) च्या तरतुदी याअंतर्गत स्थावर संपत्तींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनतेस व विशेषत: खालील निर्देशित कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील निर्देशित स्थावर मालमत्ता ज्यांचा ताबा ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला. पुढे, ओमकारा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओएआरपीएल) (ओमकारा पीएस ३०/२०२१-२२ ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून आपल्या क्षमतेत कार्यरत) यांनी इंडसइंड बँक लि. (अभिहस्तांकन करार बँक) यांच्याकडून अभिहस्तांकन करार बँककडून खालील निर्देशित प्रतिभूतींसमवेत अभिहस्तांकन करार दि. ३०.०९.२०२१ अंतर्गत खालील खात्यातील संपूर्ण थकीत कर्जाचे संपादन केले. त्यानुसार ओएआरपीएल यांनी अभिहस्तांकन करार बँकेच्या अधिकारांचा ताबा घेतला असून, थकबाकीची वसुली करण्याचा व प्रतिभूतींवर ताबा घेण्याचा अधिकार प्राप्त केला. ओएआरपीएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित प्रतिभूत मालमत्तेचा कर्जदार-गहाणवटदार-सहकर्जदारांकडून प्रत्यक्ष ताबा सुपूर्द केला आहे. ओएआरपीएलचे प्राधिकृत अधिकारी हे ओएआरपीएल – प्रतिभूत धनको म्हणून संबंधित कर्जदार व सहकर्जदारांकडून थकीत असलेल्या खालील रकान्यात दर्शविलेल्या रकमेच्या वसुलीकरिता थकीत कर्जाच्या वसुलीसाठी खालील निर्देशित प्रतिभूतींची ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'', ''जी काही आहे तेथे आहे'' व ''विनाआडथळा तत्त्वावर'' सरफेसी कायद्याच्या कलम १३ (२) आणि ४ नुसार विक्री करू इच्छित आहेत. कर्जदार/हमीदार/गहाणवटदार, प्रतिभूती, मालक, थकीत देणी, अनु. १३ (२) अंतर्गत पाठविलेल्या मागणी सूचनेचा दिनांक, ताबा दिनांक, राखीव मूल्य, बोली विस्तार रक्कम, इसारा रक्कम ठेव (इरठे), परीक्षण दिनांक व वेळ आदी तपशील खालीलप्रमाणे आहे :

अ क्र.	कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांचे नाव	प्रतिभूत संपत्तीचा तपशील	मालकाचे नाव	२६.०४.२०२४ रोजीनुसार थकीत रक्कम (रु.मध्ये)	मागणी सूचना दिनांक	ताबा दिनांक	राखीव मूल्य (रु. लाखांत)	बोली विस्तार रक्कम	इरठे	परीक्षण दिनांक व वेळ
१	**मे. पूजा फरसाण मार्ट (कर्जदार), श्री. धनराज एन. शाह (सहकर्जदार/ गहाणवटदार), श्री. नितीन भीकचंद शाह (सहकर्जदार) (एलएन : एमडब्ल्यूके०००१३एन)**	पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड – मुख्य घर क्र. ३५ व १९ (रो-हाऊस), इमारतीचे नाव ''गणेश हाऊसेस'', गणेश रो-हाऊसेस को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, अन्नपूर्णानगर, आधारवाडी चौक, कल्याण (पूर्व), सर्व्हे क्र. ४८ व ४९, कल्याण-४२१ ३०१, मोजमापित ५६० चौ. फूट (सुपर बिल्टअप क्षेत्र), पूर्वेस : बंगलो क्र. १८, पश्चिमेस : मोकळा भूखंड, दक्षिणेस : अंतर्गत रस्ता, उत्तरेस : इमारत.	श्री. धनराज एन. शाह	रु. २२,६२,०२६.६१ (रु. बावीस लाख बासष्ट हजार सव्वीस व एकसष्ट पैसे मात्र)	१८.०४.२०२२	०४.०८.२०२३	रु. ५२,००,०००/- (रु. बावन्न लाख मात्र)	रु. ५०,०००/-	रु. ५,२०,०००/- (रु. पाच लाख वीस हजार मात्र)	०८.०५.२०२४ रोजी दु. ३.०० ते दु. ४.००
खाते क्र. : ०५५५०५०१०२२९, लाभार्थी नाव : ओमकारा पीएस ३०/२०२१-२२ ट्रस्ट, बँकेचे नाव : आयसीआयसीआय बँक, शाखा : वांद्रे (पू.), मुंबई, आयएफएससी कोड : आयसीआयसी०००००५५५										
ई-लिलाव दिनांक व वेळ : दि. २९.०५.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. २.००							सहभागासाठी बोली पत्र/केवायसी दस्तावेज/इरठेचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दि. २७.०५.२०२४ रोजी सायं. ५.३० पर्यंत			
लिलाव अटी व शर्ती : विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया प्रतिभूत धनकोंची (ओएआरपीएल) वेबसाइट अर्थात http://omkaraarc.com/auction.php वर दिलेली लिंक किंवा सेवा प्रदात्यांची वेबसाइट http://www.bankeauction.com येथे भेट द्यावी.										

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत विक्रीची वैधानिक सूचना

सदर सूचना ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत तसेच सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत वरील निर्देशित कर्ज खात्याच्या कर्जदारांसाठी कमाल १५ (पंधरा) दिवसांच्या कालावधीकरिताची अनिवार्य सूचना आहे, ज्याअंतर्गत त्यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील निर्देशित तारीख व वेळेवर लिलाव – विक्री आयोजित करण्यासंदर्भात सूचित करण्यात येत आहे.

दिनांक : ०३.०५.२०२४

ठिकाण : कल्याण, मुंबई

सही/- प्राधिकृत अधिकारी, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओमकारा पीएस ३०/२०२१-२२ ट्रस्टच्या ट्रस्टींच्या क्षमतेत कार्यरत)

जाहीर सूचना

एकता एसआरए सीएचएस (नियोजित) (स्कीम १) करिता पी/दक्षिण विभाग, डीसीपीआर २०३४ च्या विनियम ३० अंतर्गत गाव पहाडी, गोरेगाव (प.), तालुका बोरिवली (एमएसडी), रस्ता क्र. १७ व १८, जवाहरनगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई येथील सीटीएस क्र. ४४६, ४४७, ४४७/१ ते १४, ४४८, ४४८/१ ते २३, ४४९, ४४९/१ ते २२, ४५०, ४५०/१ ते २२, ४५१, ४५१/१ ते २५, ४५३, ४५३/१ ते २९ धारक झोपडपट्टी भूखंडावरील तसेच सीटीएस क्र. ४५२ धारक बिगरझोपडपट्टी भूखंडावरील तसेच जवाहरनगर रस्ता क्र. १७, गोरेगाव (पश्चिम), डीसीपीआर-२०३४ चे विनियमन ३० अंतर्गत गाव पहाडी, गोरेगाव (प.), तालुका बोरिवली (एमएसडी) येथील सीटीएस क्र. ४३९, ४४१, ४४३/ए, ४४३/बी व ४४३/सी धारक बिगरझोपडपट्टी भूखंडासहित, शुभम एसआरए सीएचएस (नियोजित) (स्कीम २) करिता डीसीपीआर-२०३४ च्या विनि. ३३ (१०) अंतर्गत गाव पहाडी, गोरेगाव (प.), तालुका बोरिवली (एमएसडी), मुंबई येथील सीटीएस क्र. ४४०, ४४०/१ ते २१ व ४४२, ४४२/१ ते १५ धारक झोपडपट्टी भूखंडासहित धारक भूखंडावरील प्रस्तावित झोपडपट्टी पुनर्विकास योजनेशी संबंधित सर्व व्यक्तींना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकारी, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ यांनी संयुक्तरीत्या मे. अरिहा बिल्डटेक एलएलपी व मे. श्री फुलेश्वरी इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी, पत्ता जी-१, वॉशिंग्टन प्लाझा, टोपीवाला लेन, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०० १०४ यांना एलओए क्र. P-S/PVT/0098/20220603/LOI and P-S/PVT/0093/20220211/LOI dated October 31, 2023 व पुढे सुधारित एलओए क्र. P-S/PVT/0098/20220603/LOI and P-S/PVT/0093/20220211/LOI dated April 2, 2024 जारी केले आहे, ज्याअंतर्गत अरिहा बिल्डटेक एलएलपी व श्री फुलेश्वरी इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी यांना सदर भूखंडाच्या पुनर्विकासाकरिता एकता एसआरए सीएचएस (नियोजित) व शुभम एसआरए सीएचएस (नियोजित) मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे कोणाही सभासदास व व्यक्तीस सदर भूखंडासंदर्भात काही हरकत असल्यास वरील निर्देशित पत्यावर ०७ दिवसांच्या आत संपर्क साधावा.

मुंबई, दि. ०३.०५.२०२४

निडो होम फायनान्स लिमिटेड

nido HOME FINANCE

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

ई-लिलाव – वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची ''**जशी आहे जेथे आहे तत्त्वावर**'' व ''**जशी आहे जी आहे तत्त्वावर**'' विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार/सहकर्जदार/हमीदाराद्वारे प्राप्त कर्जाकरिता मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात) यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ	परीक्षणाचा दिनांक व वेळ	प्रत्यक्ष ताबा दिनांक
१	**मोह. याकूब अब्दुल कादर शेख (कर्जदार), रेश्मा मोहम्मद याकूब शेख (सहकर्जदार)**	**एलएन नं. एलकेवायएनएसटीएच००००००७५३२९** करिता दि. २३.०४.२०२४ रोजीनुसार **रु. १९,८८,५२८.८७** (रु. एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे अठ्ठावीस व सत्त्याऐंशी पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च.	**रु. १४,०५,४४०/-** (रु. चौदा लाख पाच हजार चारशे चाळीस मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. १,४०,५४४/-** (रु. एक लाख चाळीस हजार पाचशे चव्वेचाळीस मात्र)	**२३.०५.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयंविस्तारासह)**	**०९.०५.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००**	०६.१२.२०२३

प्रतिभूत संपत्तीचा तपशील – मालमत्तेची अनुसूची : अपार्टमेंट/फ्लॅट क्र. १०१, मोजमापित २४.२० चौ. मी. चटई क्षेत्रफळ स्वरूपातील, खुली बाल्कनी क्षेत्र ७.७२ चौ. मी., कप बोर्ड ०.९० चौ. मी., पहिला मजला, ब्रह्मा हाइट्स नावाने ज्ञात इमारतीतील – सदर इमारतीचा भाग असलेल्या, दिलकॅप कॉलेजजवळ, दिलकॅप कॉलेज रोड, नेरळ (पूर्व), नेरळ-४१० १०१, सर्व्हे क्र. ११६, प्लॉट क्र. ७, ८ व ९ धारक बिगरशेतजमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित, गाव ममदापूर, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक कर्जत-रायगड यांच्या हद्दीतील, नोंदणीकरण जिल्हा रायगड येथील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्रासह पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर ''**ऑनलाइन ई-लिलावात**'' सहभागासाठी पात्र असतील.

२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : **निडो होम फायनान्स लिमिटेड**, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.

३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : **२२.०५.२०२४.**

४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा श्री. मौलिक श्रीमाली, दूर. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिशः संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : श्री. श्रीकांत पाठारे ९७६८७४६६२४/श्रीमती सुरेखा भांगे ९००४३८९५३८.

दिनांक : ०३.०५.२०२४

सही/- प्राधिकृत अधिकारी निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे

गांवदेवी मंडई ईमारत, पहिला मजला, गोखले रोड, ठाणे पश्चिम-४०१ ६०२

दुरध्वनी क्र. २५३३१४८६ **email-ddr.tna@gmail.com**

जा.क्र.जिउनि/ठाणे/बी.१०/श्रीकुलस्वामी/अपसेट प्राईज/२७४२/
सन २०२४, दिनांक : ०२/०५/२०२४

जाहिर नोटीस

स्थावर मिळकत / जंगम मालमत्ता जाहिर लिलावाने विक्री करणेपूर्वी तिचे वाजवी मूल्य ठरवून मिळणेबाबत..

प्रति,

वसुली व विक्री अधिकारी,
श्री कुलस्वामी को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., वाशी
एफ-३, १ ला मजला, सेंट्रल फॅसिलिटी बि., ए. पी. एम. सी. फ्रुट मार्केट, वाशी, नवी मुंबई
शाखा - बदलापूर ..... **अर्जदार**

विरुध्द

१) **श्री. सुधाकर दिलीप जाधव (कर्जदार),**
रूम नं. ५६२, जाधव कॉलनी, कृष्णा कुटीर मार्ग, जयदीप किराणा स्टोअर्स जवळ, बेलवली, बदलापूर (प)

२) **श्री. दिलीप खंडू जाधव (सहकर्जदार),**
रूम नं. ५६२, जाधव कॉलनी, कृष्णा कुटीर मार्ग, जयदीप किराणा स्टोअर्स जवळ, बेलवली, बदलापूर (प) ..... **प्रतिवादी**

दावा क्र. ४३/२०२४

वसुली व विक्री अधिकारी,
श्री कुलस्वामी को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., वाशी
एफ-३, १ ला मजला, सेंट्रल फॅसिलिटी बि., ए. पी. एम. सी. फ्रुट मार्केट, वाशी, नवी मुंबई
शाखा - बदलापूर ..... **अर्जदार**

विरुध्द

१) **श्री. रविंद्र सुराजी पोखरकर (कर्जदार),**
ए-७०४, ब्रनव्हेव आर्केड, साईप्रसाद रेसिडेन्सी को. ऑप. हौ. सो. लि., गणेश घाट, कात्रप, बदलापूर (पूर्व), ता. अंबरनाथ

२) **श्री. विलास सुराजी पोखरकर (सहकर्जदार),**
ए-७०४, ब्रनव्हेव आर्केड, साईप्रसाद रेसिडेन्सी को. ऑप. हौ. सो. लि., गणेश घाट, कात्रप, बदलापूर (प